महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
४ था मजला, प्लॉट जी - ९, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.
दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
email : ciro@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

जा.क्र. : औसंवि/ब/ककनिस/वैद्यकीय/५८४६ दिनांक : ०७/०३/२०१२

## परिपत्रक

विषय : कर्मचारी सेवाकाळात मयत पावल्यास त्यांच्या अवलंबितास कर्मचारी कल्याण निधीतून आर्थिक मदत देण्याबाबत.

संदर्भ : परिपत्रक क्र.काऔसंवि/ब/ककनिस/५२वी बैठक/३२८८६ दि.०२/११/२०११.

**********

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी कल्याण निधी समितीच्या ५२ व्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार या कार्यालयाचे परिपत्रक क्र. काऔसंवि/ब/५२ वी बैठक/३२८८६, दि.०२/११/२०११ अन्वये २२ कल्याणकारी योजनांचा समावेश करण्यात आला आहे. सदर परिपत्रकातील क्र. (८) ची योजना "कंपनीचा कर्मचारी सेवाकाळात मयत झाल्यास त्याच्या अवलंबितास रु. १०,०००/- (रु. दहा हजार मात्र) आर्थिक मदत रोखीने देण्यात यावी," अशा प्रकारची आहे.

संदर्भित परिपत्रकात याबाबत क्षेत्रीय कार्यालयातील उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकाऱ्याने सदर मदत मृतकर्मचाऱ्यांच्या अवलंबितांना वितरित करण्याचे बाबतीत कार्यवाहीचे स्पष्ट निर्देश दिले असताना सुद्धा क्षेत्रीय कार्यालयातून आर्थिक मदतीचे प्रस्ताव मुख्य कार्यालयातील औद्योगिक संबंध विभागाकडे पाठविण्यात येत आहेत.

या योजनेचा मुख्य उद्देश कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांना दुःखाचे प्रसंगी / आलेल्या आपत्तीच्या वेळी त्वरीत मदत मिळणे असा आहे. यास्तव पुन्हा असे निर्देश देण्यात येतात की, कंपनीचा कर्मचारी सेवाकाळात मयत झाल्यास संबंधित मंडलातील / विभागातील मानव संसाधन विभागाने कर्मचाऱ्यांच्या अवलंबितामार्फत क.क.नि. मधून आर्थिक मदत मिळण्याकरिताचा अर्ज व कर्मचाऱ्याचा मृत्युचा दाखला घेऊन आर्थिक मदतीचा प्रस्ताव संबंधित मुख्य अभियंता यांच्याकडे त्वरीत मंजुरीसाठी पाठवावा. उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकाऱ्यांनी मुख्य अभियंता यांची मंजुरी घेऊन ताबडतोब आर्थिक मदत संबंधितांना अदा करण्याची कार्यवाही करावी. संबंधित मंडल कार्यालयाचे अधीक्षक अभियंता व विभागातील कार्यकारी अभियंता यांनी देखील रु.१०,०००/- ची रक्कम आर्थिक मदत म्हणून रोखीने कर्मचाऱ्याच्या अवलंबितास त्यांच्या स्तरावर ताबडतोब अदा करावी व सदर रक्कम कर्मचारी कल्याण निधी आर्थिक मदत या शिर्षकाखाली वर्ग करण्यात यावी.

D-18
190

कर्मचारी कल्याण निधीमार्फत वाटप करण्यात आलेल्या आर्थिक मदतीच्या रकमेचा सांघिक कार्यालय स्तरावर लेखा-जोखा ठेवण्याच्या दृष्टीने उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकाऱ्यांनी अशा प्रकरणी मुख्य अभियंता यांनी मंजूर केलेल्या आर्थिक मदतीच्या प्रस्तावाची एक प्रत माहितीसाठी या विभागाकडे पाठवावी.

तसेच परिपत्रकात नमूद केलेल्या उर्वरित २१ योजनांचे प्रस्ताव सदस्य / सचिव, कर्मचारी कल्याण निधी समिती तथा मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महावितरण, सांघिक कार्यालय, मुंबई यांच्या मंजुरीसाठी क्षेत्रीय कार्यालयातील उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकाऱ्यांमार्फत सादर करण्याचे निर्देश देण्यात येत आहेत.

सदस्य / सचिव, कर्मचारी कल्याण निधी समिती
तथा मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

O/C

प्रत सविनय सादर :
कार्यकारी संचालक (मा.सं.), महावितरण, सांघिक कार्यालय, मुंबई.

प्रत सस्नेह सादर :
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महानिर्मिती / महापारेषण. सांघिक कार्यालय, मुंबई.

आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या स्तरावर आपल्या कंपनीच्या क्षेत्रीय कार्यालयास वरील बाबतीत निर्देश द्यावेत तसेच इतर २१ योजनांबाबत आलेल्या प्रस्तावांची आपल्या स्तरावर छाननी करुन फक्त परिपूर्ण असलेले प्रस्ताव या कार्यालयास मंजुरीसाठी सादर करावेत. तसेच परिपत्रकाचे वितरण आपल्या स्तरावर करावे.

प्रत रवाना:
महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीनुसार कार्यकारी अभियंता स्तरापर्यंत.